संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# तापमान वाढवणारे तापदायक व्यवहार

**केवळ** उन्हाळा आला म्हणजेच तापमानाची तीव्रता जाणवते असे नाही. तर हल्ली अगदी हिवाळ्यातसुध्दा दुपारच्या काळात उन्हाचा चटका जाणवत असतो. विशेषतः सर्व मोठ्या शहरांमध्ये तापमानाचा त्रास सर्वाधिकपणे असल्याचे दिसून येते. यापूर्वीसुध्दा उन्हाळा हा ऋतू नव्हता असे नाही. आजच्यासारखा उन्हाळा त्याकाळी जाणवत नसे किंवा तो सहन करण्याइतपत सौम्य असायचा. परंतु आताच्या उन्हाळ्यामधले तापमान सहन करताना प्रत्येकालाच धाप लागते. याची अनेक कारणे सांगितली जातात. परंतु दोन विशेष कारणांमुळे प्रत्येक महानगरातल्या किंवा शहरातल्या तापमानात वाढ होते. या दोन गोष्टी म्हणजे ठिकठिकाणी उभ्या राहिलेल्या टोलेजंग सिमेंटच्या इमारती आणि तितक्याच प्रचंड प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या शहरांच्या तापमानाची पातळी वाढवतात. एकीकडे पर्यावरण रक्षणाचे आवाहन केले जाते. पर्यावरण पूरक वस्तू वापरा म्हणून सरकारकडूनच जाहीराती केल्या जातात. परंतु सरकारी यंत्रणाच पर्यावरणाला तुच्छ लेखण्याचे प्रत्यक्ष काम करताना पाहायला मिळते. सामान्य माणूस या वाढत्या तापमानापासून स्वतःला वाचवण्याकरीता त्याच्या हातामध्ये जेवढ्या गोष्टी करता येण्यासारख्या आहेत तेवढ्या करण्याचा तो प्रयत्न करतो. मात्र सरकारने ज्यासंदर्भात पुढाकार घ्यायला हवा तो सरकार घेत नाही. म्हणजेच एकूणच पर्यावरणाच्या रक्षणासाठी जेव्हा वाढत्या तापमानाला लगाम घालण्यासाठी जी कृती करायला हवी. ती सरकारकडून होत नाही. आज देशातल्या कोणत्याही पर्यावरण किंवा प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या कार्यालयांमध्ये जाऊन बघा आपल्याला त्याचा अनुभव येईल. अगदी दिल्लीतले पर्यावरण भवन असो किंवा महाराष्ट्रातले प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय असो. इथे पर्यावरणालाच छेद देणाऱ्या अनेक गोष्टी पाहायला मिळतील. खरे तर पर्यावरण मंत्रालयाची सर्व कार्यालये ही निसर्गपूरक सामुग्रीतून तयार केलेली असली पाहिजे. त्या कार्यालयात वापरल्या जाणाऱ्या सगळ्या वस्तू किमान ८० ते ९० टक्के निसर्गनिगडीत असल्या पाहिजेत. परंतु या इमारतीसुध्दा सिमेंट काँक्रिटच्याच असतात. उलट एअर कंडिशनचा सर्वाधिक वापर याच कार्यालयांमध्येही पाहायला मिळतो. त्याठिकाणचे दिवे, पंखे, कार्यालयातल्या अधिकाऱ्यांच्या वातानुकुलित गाड्या अशी ही यादी जर केली तर त्यामधून पर्यावरण मंत्रालय किंवा पर्यावरण विभागाकडूनच किती वातावरणाच्या विरुध्द वस्तूंचा वापर होत असल्याचे पाहायला मिळू शकेल.

### आरे वसाहतीत आता सिमेंटची जंगले

पर्यावरण प्रदूषणाचे किंवा वाढत्या तापमानाची अतिशय भीषण समस्या निर्माण झाली असताना सरकारकडून त्याची तेवढ्याच गांभीर्याने दखल घेतलेली नाही. हा विरोधाभास किंवा सरकारी यंत्रणांचा विचित्रपणा ठळकपणे लक्षात येण्याचे कारणही अलिकडे घडले. मुंबईसारख्या महानगरात सध्या आरे वसाहत ही त्यातल्या त्यात निसर्ग जपणारा एकमेव प्रकल्प ठरतो. पण आता मेट्रोच्या नावाखाली तिथेही या सरकारी यंत्रणांनी घुसखोरी केली आहे. मेट्रोच्या कारशेडसाठी गेल्याच वर्षी तिथे बेसुमार वृक्षतोड झाली आणि आता मुंबईतल्या या मेट्रो जाळ्याचे व्यवस्थापन करण्याकरीता आरे वसाहतीच्या जागेत तब्बल बत्तीस मजल्यांची टोलेजंग इमारत बांधली जाणार आहे. आरेसारख्या निसर्गरम्य परिसरातसुध्दा जर आता या पध्दतीने सिमेंटची जंगले आक्रमण करू लागली तर पर्यावरणाचे तीनतेरा वाजवण्याचा विडा सरकारनेच उचलला आहे असे म्हणावे लागेल. एकतर मुंबईसारख्या जागेची टंचाई असलेल्या महानगरात निसर्गयुक्त परिसरच उरलेला नाही. हाताच्या बोटावर मोजण्याइतकी जी काही ठिकाणे शिल्लक आहेत त्यालाही नख लावण्याचा प्रकार सुरु झाला आहे. निदान ही इमारत आपण आरेसारख्या निसर्गरम्य परिसरात बांधतो आहोत याचे भान ठेवून ती पर्यावरणपूरक कशी बांधली जाईल याचा तरी विचार व्हायला हवा. इतक्या सुंदर अशा नैसर्गिक वातावरणात ही टोलेजंग सिमेंट काँक्रिटची जंगले उभी करणे म्हणजे तिथल्या निसर्गाची हत्या घडवून आणण्यासारखे म्हणावे लागेल. विकास किंवा पायाभूत सोयीसुविधांची उभारणी करताना या पध्दतीने पायावरच धोंडा पाडून घेण्याचा उद्योग चुकीचा ठरतो. विकास करताना तोदेखील पर्यावरणपूरक राहील याला प्राधान्य दिले पाहिजे. नागपूरमध्ये मेट्रोसाठी जवळपास चाळीस टक्के वीज ही सौर ऊर्जेतून मिळवली जाते. हा जसा एक छोटा प्रयत्न केला गेला. त्याप्रमाणे उष्णता न शोषणारे किंवा उष्णता बाहेर फेकणारी सिमेंटच्या इमारतींचे बांधकाम टाळले पाहिजे. त्यासाठी इतर निसर्गपूरक सामुग्री वापरून इमारतींचे बांधकाम करता आले पाहिजे.

### वाहनांची प्रचंड संख्या

म्हणजेच सर्व सरकारी कार्यालयांची निर्मिती किंवा व्यवहार पर्यावरणाला अनुकूल राहातील यावर भर देण्याची आवश्यकता आहे. तोच प्रकार सध्या देशातल्या वाहनांबाबत पाहायला मिळतो. रोज लाखो वाहने रस्त्यावर धावतात. आणि या वातानुकुलित वाहनांमधून वातावरणात दुप्पट गरम हवा फेकली जाते. आजुबाजूच्या सिमेंटच्या इमारती उष्णता शोषत नाहीत. तर त्या बाहेर फेकत असतात. तर दुसरीकडे रस्त्यांवरची वाहने गरम हवा ओकतच धावतात. या सर्वांचा एकत्रित परिणाम तापमान वाढण्यामध्ये होतो आहे. याशिवाय औद्योगिकरण, रेल्वे विमान वाहतुकीचा वाढता पसारा या गोष्टीदेखील तापमानाला साहाय्य करीत राहातात. अशावेळी सर्व प्रथम सरकारी यंत्रणांकडून कृतीशील उपाययोजना प्रत्यक्ष केल्या गेल्या पाहिजेत. म्हणजेच पर्यावरणाला धोका पोहचणार नाही. वातावरण प्रदूषित होणार नाही. अशा गोष्टींचा वापर सरकारी कार्यालयांमधूनच सर्वप्रथम सुरु झाला पाहिजे. यासाठी तितक्याच मोठ्या चळवळीची आणि प्रबोधनाची गरज भासू शकेल. मनुष्य किंवा कोणत्याही जीवमात्राचे जीवनमान सुरक्षित करायचे असेल तर ज्या किमान गोष्टी करता येणे शक्य आहे त्याला त्या आवर्जून केल्या पाहिजेत.केवळ जाहीरातबाजी आणि भाषणांचे किंवा कार्यक्रमांचे रतिब घालून या गोष्टी आटोक्यात येणार नाही. तापमानालाच तापदायक ठरणारे निर्णय होत राहातात. व्यवहारही तसेच केले जातात. आणि मग त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर सर्वांनाच भोगावे लागतात.